MHYA050044302025

दाखल तारीख – २४/११/२०२५
नोंदणी तारीख – २४/११/२०२५
निकाल तारीख – १०/०७/२०२६
कालावधी – ०० व. ०७ म. १६दि.

# न्यायनिर्णय

(दिनांक १०/०७/२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कायदाचे कलम १२ अ अन्वये चालविण्यात आला आहे.

२. सरकारी वकिलांचा आणि आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सरकार पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुराव्यांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असुन त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १६/१०/२०२५ रोजी ४.०० वाजताच्या सुमारास ग्राम शेंबाळपिंपरी येथील मुळावा पॉईन्टच्या बाजुला ता. पुसद जिल्हा यवतमाळ येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपी हे वरळी मटका नावाचा हारजीतचा जुगार खेळतांना मिळुन आले व महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कायदाचे कलम १२ अ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

# कारणमिमांसा

## मुद्दा क्र. १ करीता

३. सरकार पक्षाने आरोपींविरूध्द सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी एक साक्षीदार तपासला असुन साक्षीदार अनिल बापूसिंग आडे हे घटनास्थळ जप्ती पंच असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत पोलिसांनी त्यांचे समक्ष पंचनामा केला नसल्याचे कथन केले आहे. तसेच पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहित नाही असे सांगुन सरकार पक्षास मदत केली नाही. सदर साक्षीदाराने पोलिसांनी त्यांचे समक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही सरकार पक्षाच्या उपयोगाची नाही.

४. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षास हे प्रस्थापित करणे गरजेचे आहे की, आरोपी हे वरळी मटका नावाचा हारजीतचा जुगार खेळत होते.

५. अभियोगपक्षाच्या कथनानुसार आरोपी हे स्वताच्या फायदयाकरीता अवैधरित्या लोकांकडून पैशाची बाजी लावुन वरळी मटका नावाचा जुगार खेळत होते. परंतू अभियोगपक्षातर्फे नोंदवण्यात आलेल्या पुराव्यातून आरोपींनी कोणत्या ईसमाच्या नावे कोणत्या आकड्यावर किती रक्कम जुगारासाठी लावली होती ही बाब अभिलेखावर येवू शकलेली नाही. तसेच आरोपींनी कोणत्या इसमाकडुन पैसे घेतले तसेच कोणत्या इसमाकडुन किती रुपये घेतले याबाबत देखील कुठलाही पुरावा

अभिलेखावर नोंदवण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपी हे अवैधरीत्या वरळी मटका नावाचा हारजीतचा जुगार खेळत होते याबाबत संशय निर्माण होतो. वरिल सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, अभिलेखावरील पुरावा हा आरोपींविरुध्द गुन्हा निसंशयीतरीत्या सिध्द करण्यास अपुरा ठरतो. त्यामुळे मी मुददा क्रं १ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

## मुद्दा क्र. २ करीता

६. मुद्दा क्र. १ चे नकारार्थी निष्कर्ष लक्षात घेता आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरले आहेत. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी आरोपीकडुन नगदी २०५०/– रूपये व वरळी मटका साहित्य मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल नगदी २०५०/– रूपये हे आव्हानीत कालावधीनंतर सरकारजमा करणे न्यायोचित होईल. जप्त मुद्देमाल वरळी मटका साहित्य उपयोगशुन्य व मुल्यहिन असल्यामुळे नाश करणे योग्य होईल. प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द आव्हान करणेकामी आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ अन्वये प्रत्येकी रक्कम रूपये १५,०००/– चे बंधपत्र व जातमुचलका देण्याचे निर्देष देण्यात आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

# <u>आ दे श</u>

१. आरोपी क्र. १ गौतम किसन थोरात व आरोपी क्र. २ शेख मेहमूद शेख रज्जाक यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम २३२(१) अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कायदा कलम १२ अ नुसारचे गुन्ह्यामधुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल नगदी रू. २०५०/– हे आव्हानीत कालावधी नंतर सरकारजमा करण्यात यावे.

४. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल वरळी मटका साहित्य हे उपयोगशुन्य व मुल्यहिन असल्यामुळे नाश करण्यात यावे.

५. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ कलम ४८१ प्रमाणे जमानतीची पूर्तता करावी.

CHONDE GAJANAN GOVINDRAO
Digitally signed by CHONDE GAJANAN GOVINDRAO
Date: 2026.07.13 12:10:51 +0530

**(जी. जी. चोंडे)**

दिनांक – १०/०७/२०२६

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**

**न्यायालय क्र. १, पुसद**

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Jt. C.J.J.D.and J.M.F.C, Pusad |
| Date of Signature of Presiding Officer | 10/07/2026 |
| Date of Judgment Uploaded | 10/07/2026 |

दिनांक – १०/०७/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी–१, यवतमाळ.
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पूसद,